# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

फोन ०२०-२५६०१२१५
फॅक्स ०२० २५६०१२०६
website : www.unipune.ac.in

गणेशखिंड,
पुणे -४११००७
email :st-science@unipune.ac.in

संदर्भ क्रमांक परीक्षा/बी.एस्सी./१३५.  दिनांक ०६/०२/२०१५

प्रति,
मा.प्राचार्य/प्राचार्या,
सर्व संलग्न विज्ञान महाविद्यालये,

**विषय** — बी.एस्सी. ऑक्टोबर/नोव्हेंबर,२०१४ परीक्षेच्या गुणपत्रकांबाबत...

महोदय/महोदया,

ऑक्टोबर/नोव्हेंबर,२०१४ मध्ये झालेल्या बी.एस्सी. परीक्षेचा निकाल शुक्रवार, दिनांक २३/०१/२०१५ रोजी जाहीर करण्यात आला आहे. परीक्षेची गुणपत्रके खालीलप्रमाणे वितरीत करण्यात येतील.

१. पुणे शहर व पुणे जिल्हयातील महाविद्यालयांनी **सोमवार, दिनांक ०९/०२/२०१५ रोजी सकाळी ११.०० ते सायं. ५.००** या वेळेत परीक्षा विभागातून गुणपत्रके घेऊन जायची आहेत.
२. नाशिक जिल्यातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचा निकाल संबंधित विद्यापीठ उपकेंद्रातून **सोमवार, दिनांक ०९/०२/२०१५ रोजी दुपारी १२.०० ते सायं. ५.००** या वेळेत घेऊन जायचा आहे.
३. अहमदनगर जिल्हयातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचा निकाल संबंधित विद्यापीठ उपकेंद्रातून **सोमवार, दिनांक ०९/०२/२०१५ रोजी दुपारी १२.०० ते ५.००** या वेळेत घेऊन जायचा आहे.
४. अहमदनगर जिल्हयातील अकोले, राहाता, कोपरगांव आणि संगमनेर तालुक्यातील सर्व महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचा निकाल संगमनेर नगरपालिका आर्टस डी.जे.मालपाणी कॉमर्स आणि बी.एम.सारडा विज्ञान महाविद्यालय,संगमनेर ४२२ ६०५ येथून **सोमवार, दिनांक ०९/०२/२०१५ रोजी दुपारी १२.०० ते सायं.५.००** या वेळेत घेऊन जायचा आहे.

आपल्या महाविद्यालयामार्फत उपरोक्त परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना देण्याची व्यवस्था करावी. त्यामुळे विद्यापीठामध्ये निकाल विचारण्यासाठी अथवा इतर चौकशी करण्यासाठी विद्यार्थ्यांना यावे लागणार नाही. **त्याचप्रमाणे एखाद्या विद्यार्थ्याच्या गुणपत्रकामध्ये काही दोष अथवा त्रुटी आढळल्यास,विद्यार्थ्यांना परस्पर विद्यापीठात न पाठविता, महाविद्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत अशी प्रकरणे तातडीने विद्यापीठाच्या परीक्षा विभागात एकत्रित आणून द्यावीत. त्यानंतर त्यातील दुरूस्त्या त्वरीत करून घेण्याबाबत कार्यवाही करता येईल.**

आपणास विनंती करण्यात येते की, उपरोक्त नमूद केल्यानुसार आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा निकाल वेळेत घेऊन जाण्याची व वितरण करण्याची व्यवस्था करावी.

कळावे,

आपला,

परीक्षा नियंत्रक

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी —**

१.विद्यापीठ उपकेंद्र प्रमुख, नाशिक/संगमनेर/अहमदनगर यांनी सदर निकाल संबंधित महाविद्यालयांना देण्याची व्यवस्था करावी.
२.मा.प्राचार्य, संगमनेर नगरपालिका आर्टस,डी.जे.मालपाणी कॉमर्स आणि बी.एम.सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर — ४२२ ६०५

*marathi/B.Sc./१९२*